226263

जा.क्र. माध्य.३( )/प्रथम मान्यता/पुवि/२००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 29 MAY 2002

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,
पुणे.

विषय : प्रथम मान्यता. . (माध्यम मराठी) विना अनुदान
शाळा जय मल्हार माध्यमिक विद्यालय, चिंचोली मोराची ता. शिरूर

संदर्भ : आपले पत्र क्रमांक :
१. शिक्षण/ माध्य/ह-४/ नमाशा/ प्रमा/ ०१-०२, दि. २.५.२००२
२. नमाशा-२००१/ ५६४/२००१/ माशि-१, दि. २८.८.२००१
३. माध्य-३/१४/ नमाशा/ मान्यता/ पुवि/ ०१, दि. ६.११.२००१

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये जयमल्हार कृषि विकास प्रतिष्ठान चिंचोली मोराची ता. शिरूर जि. पुणे संस्थेच्या जय मल्हार माध्यमिक विद्यालय, चिंचोली मोराची ता. शिरूर माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/~~९ वी व १० वी~~ च्या वर्गास २०००- २००१ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००० पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटोंची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, विना अनुदान
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटोंची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थिनींसाठी [illegible] सुविधा उपलब्ध करावी.

स्थळप्रतिवर शि. उ. सं.
यांची सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

प्रत : १. मुख्याध्यापक, जय मल्हार माध्यमिक विद्यालय, चिंचोली मोराची ता. शिरूर जि. पुणे

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा./९वी/०७-०२
पुणे, दि. १२/७/०२

प्रति,

सचिव,/ मुख्याध्यापक,
जय मल्हार माध्य. विद्यालय, चिंचोली-मोराची
ता. शिरूर, जि. पुणे

**विषय :-** इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता देणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या ~~संस्थेच्या~~ जय मल्हार माध्य. विद्यालय, चिंचोली मोराची या माध्यमिक विद्यालयातील इ. ८वी च्या वर्गास मा. शि. उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्रं.माध्य-३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/२३९६० /०१ दि.६/१२/०१ अन्वये परवानगी देणेत आलेली आहे. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२ नुसार उपरोक्त शाळेत जून २००१ पासून इ. ९ वीच्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देणेत येत आहे.

१] विज्ञान साहित्य पुरेसा प्रमाणात असावे.
२] विज्ञान साहित्याच्या नोंदी स्थायी/अस्थायी स्वतंत्र असाव्यात
३] ग्रंथालयासाठी ग्रंथ खरेदी करण्यात यावेत.
४] शालेय नोंदी शासन नियमानुसार असाव्यात
५]
६]

मा. शि. अ. यांची
मान्य टिपणी

J.N.H.
शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे.करिता

प्रत,

१. मुख्याध्यापक,

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा./०२-०३
पुणे, दि. २५/११/०२.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

~~जय मल्हार माध्य. विद्यालय, चिंचोली-मोराची.~~
ता. शिरूर. जि. पुणे.

विषय :- इ.१० वी वर्गास प्रथम मान्यता सन २००२-०३.

संदर्भ :- मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील पत्र क्र.माध्य-३/प्रथम मान्यता/पुवि/सोड./ /२००२-०३, दि.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपल्या जय मल्हार माध्य विद्यालय, ~~चिंचोली-~~ मोराची ता. शिरूर, जि. पुणे ह्या मराठी ~~/इंग्रजी/उर्दू~~ माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इ. १० वीच्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१. शैक्षणिकदृष्टया योग्य, पुरेशी व संस्थेच्या मालकीची इमारत असावी.
२. स्वतंत्र प्रयोगशाळा व पुरेसे विज्ञान साहित्य उपलब्ध करण्यात यावे.
३. स्वतंत्र ग्रंथालय व पुरेसे ग्रंथ उपलब्ध करण्यात यावेत.
४. क्रीडा साहित्य, शैक्षणिक साहित्य, कार्यानुभव साहित्य पुरेसे असावे.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर असावे. कार्यालयीन फर्निचर असावे.
६. पुरेशी विद्यार्थी संख्या असावी.
७. पुरेशा प्रमाणात प्रशिक्षित शिक्षक नियुक्त करण्यात यावेत.
८. मुख्या.पदी पात्र, अनुभवी व माध्यमिकसाठी स्वतंत्र मुख्याध्यापक असावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्य.शाळा संहिता नियम ८३ नुसार असावे.
१०. विद्यार्थ्यांचा अभ्यासेतर कार्यक्रमात सहभाग असावा.
११. अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर असावा.
१२. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय असावी.
१३. स्वतंत्र संगणक कक्ष असावे.
१४. शालेय समितीची, पालक शिक्षक संघाची स्थापना करून इतिवृत्त ठेवावे.
१५. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात यावी.
१६. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे. सेवानोंद पुस्तके ठेवावीत.
१७. या कार्यालयाकडून सेवक संच निश्चिती करून घेण्यात यावी.
१८. कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडण्यात यावीत.

J.N.H.
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे - १.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]

जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै. वा. /02-03

पुणे, दि. ४/६/02
४/६/२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

जय मल्हार माध्यमिक विद्यालय चिंचोली मोराची
ता. शिरूर

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. 02-03

~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, ~~इ. ९ वी~~, इ. १० वी.

आपल्या जय मल्हार कृषी विकास प्रतिष्ठान या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित जय मल्हार माध्य. विद्यालय, चिंचोली मोराची माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी /~~इ. ५ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन २००० - २००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/ २९६९०/०१, दि. ६/११/०१ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००२ - २००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, ~~इ. ९ वी~~, इ. १० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, ~~जि. प. पुणे~~ / गट शिक्षणाधिकारी, पं. स. शिरूर यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

## सांकेतिक क्रमांकासाठी प्रस्तावासोबत जोडावयाच्या प्रमाणपत्रांची यादी.

१. मुखपृष्ठ पत्र. - शाळेचे पत्र

२. विहित नमुन्यातील शिफारस पत्र [इंग्रजी व मराठी] - एस्.एस्.सी बोर्डातील नं. २८ फॉर्म.

३. शि.उप ~~या~~ कार्यालयाने दिलेल्या शाळा परवानगी पत्राची प्रत.

४. उपसंचा ~~या~~ कार्यालयाने दिलेल्या प्रथम मान्यता पत्राची प्रत.

५. इ. ९ वी, इ. १० वी नैसर्गिक वाढीने परवानगी पत्र.

६. शाळा वार्षिक तपासणी अहवाल.

७. संस्थेची घटना. [झेरॉक्स प्रत साक्षांकित केलेली.]

८. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी. मा. धर्मादाय आयुक्त यांनी मान्य केलेली.

९. इ. १० वी तील विद्यार्थ्यांची यादी.

१०. शासन निर्णय व खात्याचे नियम काटेकोरपणे पालन करणेबाबत संस्थेचे रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थाप्रमुखाचे हमीपत्र.

११. संस्थेविरुध्द गैरव्यवहाराबाबत अथवा न्यायालयात प्रकरण नसलेबाबत संस्था प्रमुखाचे हमीपत्र व त्यावर संबंधित तपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी.

सदर कागदपत्रे दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावी व एक प्रत विभागीय शिक्षण मंडळाकडे सादर करावी.

---